


जळत आहे आपले घर

आपला ग्रह वाचवण्यासाठी ग्रेटा थँनबर्गचे आवाहन

लेखन व चित्रः जैनेट विन्टर

मराठी: अश्विनी बर्वे

आपले पर्यावरण बदलत आहे.
आपला ग्रह गरम होत आहे.

खूप उशीर होण्याच्या आधी आपण हे थांबवण्यासाठी काही करू शकतो का? रहा है।

एका साहसी मुलीचे हे मागणे आहे- आणि ती जगाला प्रेरित सुद्धा करत आहे.




प्रभाव पाडण्यासाठी आपण कधी खूप छोटे नसतो.
- ग्रैटा थँनबर्ग



जळत आहे आपले घर

आपला ग्रह वाचवण्यासाठी ग्रेटा थँनबर्गचे आवाहन

लेखन व चित्रः जैनेट विन्टर
मराठी: अश्विनी बर्वे



ग्रेटा एक शांत मुलगी आहे,
जी स्टॉकहोम शहरात
एक शांत जीवन जगते आहे.
तिचा कुत्राच तिचा मित्र आहे.





. . .ती मागे बसलेली अदृश्य मुलगी जी काही बोलत नसे,
शाळेत नेहमी ती एकटी पडत असे.



तेव्हा एक दिवस ग्रेटाच्या शिक्षिकेने वर्गात पर्यावरणाबद्दल सांगितलं. त्यांनी सांगितलं की आपला ग्रह गरम होत आहे. ध्रुवीय बर्फ वितळत आहे. सगळ्या पशू प्राण्यांचे जीवन धोक्यात आहे. मानवाचे जीवन सुद्धा धोक्यात आहे.



या क्षणाने ग्रेटाचे जीवन बदलले.
तिने तासंतास पृथ्वी गरम होण्याच्या बाबत वाचलं
आणि त्यासंदर्भात फिल्म बघितल्या.

ग्रैटा एकाच गोष्टीबाबत अनेक तास विचार करू शकत होती.





तिने बर्फ वितळततांना आणि समुद्र गायब होतांना बघितलं.



तिने वेगाने वाहणारे वारे आणि मुसळधार पाऊस

जमिनीवर पडतांना बघितलं.



तिने बघितले की समुद्रातील प्रवाळ/पोवळे कमी होत आहे,

जसे काही गरम पाण्याने त्यांचे ब्लीच केले आहे.



ग्रैटाने प्रत्येक ठिकाणी प्राण्यांना

जिवंत राहण्यासाठी संघर्ष करतांना बघितले.




ग्रैटाने पुरामुळे घरे, लोक आणि जनावरे बुडतांना बघितले.



तिने बघितले की समुद्राची वाढणारी

पातळी पूर्ण शहराला गिळून ताकत आहे.



तिने बघितले की सूर्याची प्रचंड गरमी धरतीला सुकवत आहे.



तिने जंगलात पेटलेले दाहक वणवे बघितले.

आपले घर जळत आहे



सतत पर्यावरणाबद्दल विचार करत राहिल्याने ती निराशेत बुडून गेली.

ती खात नसे की कोणाशी बोलत नसे.



“माझ्या डोक्यात ही सगळी चित्रे जणू अडकून गेली आहेत.” दुःखाचे दिवस सतत येत होते. प्रत्येक दिवस मागच्या दिवसापेक्षा अधिक दुःख देत होता. ग्रेटाला वाटले की ती मोठी होई पर्यन्त पृथ्वी वाचते की नाही. जर भविष्यच नसेल तर अभ्यासाचा काय फायदा? ग्रेटा विचार करत होती- मी काय करू शकते.





ग्रेटाने ठरवलं की ती पर्यावरणासाठी शाळेत संप करायचा.



तिच्या आईवडिलांना तिचे म्हणणे कळले.



ग्रेटा एका शुक्रवारी शाळेत गेली नाही. ती आपले पोस्टर घेऊन निघाली होती, त्यावर लिहलेले होते: पर्यावरणासाठी शाळेचा संप

ती आपले पोस्टर घेऊन संसदेत पोहचली आणि तिथे तिने संपासाठी बसली.

तिला आशा होती की कायदा बनवणारे तिला आणि तिच्या पोस्टरकडे बघतिल.



लोक तिच्या समोरून जात होते, ते कामात इतके व्यग्र होते

की कोणी तिच्याकडे लक्ष दिले नाही.

ग्रेटा तिथेपण अदृश्य झाली होती.



पण ती दर शुक्रवारी संसदेत जात राहिली,पाऊस असला तरी.



तेव्हा अचानक संपाची बातमी पसरली.

हळूहळू इतर शाळेची मुलं सुद्धा संपात सामील झाले.

दर शुक्रवारी स्टॉकहोमच्या काही शाळा रिकाम्या राहू लागल्या.



आता जास्त लोक संप करणाऱ्या मुलांकडे लक्ष देऊ लागले.
साइबर स्पेसमध्ये शुक्रवारच्या मुलांच्या संपाची बातमी पसरली.




प्रत्येक ठिकाणी मुलं संप करू लागले.
जर मोठी माणसं आपली पृथ्वी वाचवण्यासाठी
काही करू शकत नसतील तर मुलं करतील.

ती शांत,गप्प बसणारी मुलगी, जिला नेहमी वाटे की ती अदृश्य आहे.
तिला संयुक्त राष्ट्र संघाने पोलंडमध्ये आयोजित पर्यावरण
कार्यक्रमात महत्वाच्या लोकांच्या समोर बोलण्यासाठी बोलावले.



ग्रैटा केवळ तिथेच बोलली नाही,
तर जिथे बोलणे गरजजेचे आहे तिथे ती बोलली.





त्या शांत मुलीला दावोस, स्वित्ज़रलैण्डमध्ये आयोजित
विश्व आर्थिक फोरममध्ये महत्वाच्या लोकांबरोबर
बोलण्यासाठी बोलवले गेले. बोलणे गरजेचे होते.

“माझी अशी इच्छा नाही की तुम्ही आशावादी रहावे,
तर तुम्ही घाबरावे असे मला वाटते.
मला वाटते की तुम्हाला रोज ती भीती जाणवावी
जी रोज मला जाणवत आहे.
मला वाटते तुमचे घर जळत असतांना
तुम्ही जे जे कराल ते सर्व तुम्ही करावे,
कारण खरंच तसे होत आहे.”



ग्रैटाने केलेल्या विरोधामुळे जगभरातील मुलांना विरोध करण्यासाठी प्रेरणा मिळाली.

तिचा शांत आवाज हजारो दुसऱ्या आवाजामुळे गर्जना करू लागला.

तुम्हाला ऐकू येते आहे का?


चुप्पी नाही विज्ञान
लाभ नाही ग्रह
माझे भविष्य जाळू नका
पाणी वर येत आहे
आपण पण
आपले घर जळत आहे
नाकारणे नीती नाही.
तेल पृथ्वीच्या पोटात राहू द्या
मला मदत करा
माझे म भविष्य जाळू नका
आम्हाला स्वच्छ हवा पाहिजे
पृथ्वी वाचवा
आवाज़ वाढवा,समुद्राची पातळी नाही


आपल्या आईवर प्रेम करा
कोळसा प्राण घेऊ शकतो
हे माझे भविष्य आहे
शाळेचा संप
आमचे भविष्य तुमच्या हातात
पृथ्वी वाचवा
तेल पृथ्वीच्या पोटातच राहू द्या
बहाणे देणे बंद करा
जीवाश्माच्या मागे लागू
दुसरी कोणती पृथ्वी नाही
हवा पानी जंगल ज़मीन
पर्यावरण गुन्हे थांबवा
गरम कचरा
धरतीला एक हिरवी मिठी मारा
आपला ग्रह वाचवा

तुम्ही
काय
कराल?


अआपल्या आईवर प्रेम करा
कोळसा प्राणघातक आहे
हे माझे भविष्य आहे.
शाळा संप
आमचे भविष्य तुमच्या हातात आहे
तेल पृथ्वीच्या पोटात राहू द्या
पृथ्वी वाचवा
बहाणे देणे बंद करा
जीवाश्माच्या मागे लागू
हवा पानी जंगल ज़मीन
पर्यावरण अपराध थांबवा
दुसरी कोणती पृथ्वी नाही
धरतीला एक हिरवी मिठी मारा
आपला ग्रह वाचवा
गरम कचरा